वर्ष २०
अंक १ ला
जुलै १९४६

# समाजस्वास्थ्य



संपादक -
र. धों. कर्वे.
एम्. ए.

किंमत
३
आणे

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | मोहनिद्रा—१ ... ... ... ... | १ |
| २ | जगांतल्या गंमती ... ... ... ... | ७ |
| ३ | शास्त्रज्ञांची गळचेपी... ... ... ... | ९ |
| ४ | दारूबंदीची दुसरी बाजू ... ... ... | ११ |
| ५ | पत्रव्यवहार ... ... ... ... | १२ |
| ६ | शारदेचें पत्र ... ... ... ... | १६ |



## अजंटांचीं नांवें

मुंबई : श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

पुणें : अल्. के. जोशी, बुकसेलर

कोल्हापूर: स्कूल अॅन्ड कॉलेज बुकस्टॉल.

बेळगांव: जे. एम्. माणूरकर, खडे बाजार.

अहमदनगर: पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ.

औरंगाबाद : मो. प. मुळे, बुकसेलर, खारा कुवा.

मडगांव, गोवा: मा. पं. रायकर

निपाणी : के. एस्. बळगुगीं

ग्वाल्हेर : डोके ब्रदर्स, लष्कर.

बेलापूर रोड : ना. अ. पेंडसे.

कुमठा : आर्. एम्. कामत

नागपूर : सी. सी. ताठे, नवयुग न्यूज अेजन्सी.

बारामती : मोहन बुकडेपो.



वार्षिक वर्गणी : मनीआर्डरीने दोन रुपये, व्ही. पी. ने सवादोन.

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# मोहनिद्रा–१

हिप्नॉटिझम हा शब्द पुष्कळांनी ऐकला असेल, त्याला येथे मोहनिद्रा म्हटलें आहे. यासंबंधी बऱ्याच चुकीच्या समजुती पसरलेल्या दिसतात, तेव्हां शास्त्रीय दृष्ट्या त्यांत कितपत तथ्य आहे हें येथे पाहण्याचा विचार आहे. निद्रेचा हा प्रकार फार प्राचीन काळापासून माहीत आहे आणि प्राचीन मिसर देशांत देखील त्याचा उपयोग, किंवा दुरुपयोग, करीत असत असें दिसतें.

याचा शास्त्रीय दृष्टीने विचार करण्याचा पहिला प्रयत्न मेस्मर नांवाच्या डाक्तराने केला. त्यापूर्वी देखील जॉन बॅप्टिस्ट नांवाच्या रसायनशास्त्रज्ञाने याचा उल्लेख केला आहे. मोहनिद्रेने रोग बरा झाल्यास तो सैतानाच्या साह्याने झाला असें धार्मिक लोक म्हणत असत, त्यांना त्याने मूर्ख ठरवलें आहे. पण तोही हे प्रकार लोहचुंबकाच्या जातीची आकर्षक शक्ति प्रत्येक वस्तूच्या अंगीं असल्यामुळे होतात, असें मानीत असे. हीच कल्पना पुढें दृढ होत गेली आणि मेस्मरने तिचाच पुरस्कार केला. बॅप्टिस्ट १६४४ सालीं वारला आणि मेस्मर १७३४ मधें जन्मला. व्हिअेना येथे त्याने डाक्तरीची पदवी मिळवली आणि याकरतां त्याने ‘ ग्रहांचा मनुष्याच्या शरीरावर परिणाम ’ असा विषय घेतला होता. त्या काळीं वैद्यकीचें ज्ञान फारच कमी होतें आणि यापेक्षाही विलक्षण कल्पना त्यांत आढळतात.

त्या सुमाराला फादर हेल नांवाचा जेझुअिट पंथाचा पाद्री रोग्यांवर अशा प्रकारचे प्रयोग करीत असे. त्याचाही चुंबकशक्तीवरच विश्वास होता आणि

म्हणून तो पोलादी पत्र्यांचा आणि लोहचुंबकांचा उपयोग करीत असे. या रोग्यांवर खरोखरच परिणाम होत असे आणि त्यांत कांही फसवेगिरी नव्हती, अशी मेस्मरची खात्री झाल्यावर तो स्वतः प्रयोग करूं लागला आणि लोह-चुंबकाऐवजी नुसत्या हातांनीही तसेच परिणाम होतात असें त्याला आढळलें. तेव्हां १७७५ सालीं त्याने यासंबंधी अेक पत्रक काढून तें निरनिराळ्या विद्वत्संस्थांकडे पाठवलें. त्याला फक्त बर्लिन येथील ॲकॅडेमीने उत्तर दिलें आणि तें त्याच्या विरुद्ध होतें.

पण याच सुमाराला त्याला बव्हेरिआ येथील ॲकॅडमीने सभासद करून घेतलें आणि बऱ्या झालेल्या रोग्यांनी त्याची जाहिरात केली. म्यूनिक येथील 'ॲकॅडेमी ऑफ सायन्स'चे अेक डायरेक्टर डॉ. ओस्टर्वाल्ड यांनी आपला अर्धांगवायु बरा झाल्याचें सांगितलें व प्रो. बाउर यांचा नेत्ररोग बरा झाला. त्याच्याकडील सभांना सामान्य लोकच नव्हे तर राजघराण्यांतील लोकही जात असत. सुरवातीला तो केवळ स्पर्शाचाच उपयोग करीत असे, पण नंतर तीच शक्ति लांकडाच्या किंवा धातूच्या अनेक वस्तूंना देतां येते आणि त्यांच्या स्पर्शा-नेही रोग बरे होतात असें तो म्हणूं लागला. तो अशा रीतीने रोग बरे करूं लागल्यामुळे तेथील डाक्तर त्याचा द्वेष करूं लागले आणि तोही थोडाबहुत भांडखोरच असल्यामुळे १७७८ सालीं व्हिअेना सोडून पॅरिस येथे गेला.

येथे त्याने अेक फूट खोलीचा आणि चारपांच फूट व्यासाचा अेक हौद तयार केला व हा हौद दुसऱ्या एका हौदांत ठेवला. या हौदांत कांही बाटल्या हौदाच्या मध्याकडे तोंड करून, आणि कांही याच्या उलट तोंड करून, ओळीने लावलेल्या असत. कांही बाटल्यांत ( त्याच्या मतें ) चुंबकशक्ति असलेलें पाणी भरलेलें असे. असे बाटल्यांचे अनेक थर झाले म्हणजे त्या हौदांत विलक्षण शक्ति आली अशी त्याची कल्पना असे. नंतर त्यांत पाणी ओतून शिवाय कांचेची पूड आणि लोखंडाचा भुसाही तो घालीत असे. असाच दुसरा अेक हौद असे, पण त्यांत पाणी नसे. हौदावर झांकण असे आणि वांकलेल्या लोखंडाच्या सळया घालतां येतील अशीं भोंकें ठेवलेलीं असत. या सळया रोग्यांच्या शरीराला लावण्याकरतां

होत्या आणि शिवाय झांकणांत बसवलेल्या अेका वळयांत अेक दोरी घातलेली असे आणि रोगी तीही आपल्या भोंवतीं गुडाळीत असत. ज्यांच्या अंगावर कांही उठल्या-मुळें लोकांना घाण वाटेल असे रोगी यांत नसत. हे रोगी अेकमेकांना हात, पाय, गुडघे, वगैरेच्या द्वारें स्पर्श करीत असत. या सर्व तयारीचा परिणाम स्त्रियांवर ताबडतोब होत असे. त्यांच्या पायांत जीव नाहीसा होऊन, त्यांचे डोळे मिटून, त्या जांभया देऊं लागत. त्या अेकमेकींना आलिंगन देत किंवा दूर ढकलीत. दुसऱ्या अेका खोलींत अशीच व्यवस्था असून शिवाय भिंतींना गाद्या असत. येथे विशेष प्रकारचे रोगी असत, त्यांच्यावर फाजील परिणाम झाल्यामुळे ते भिंतींवर डोकीं आपटून घेत. या सर्व रोग्यांत मेस्मर स्वतः हातांत अेक जादूची कांडी घेऊन आणि जांभळट रंगाचा झगा घालून हिंडत असे. कित्येकांना तो कांडीने स्पर्श करी, कित्येकांचे हात धरून त्यांच्याकडे टक लावून पाही किंवा हातवारे करी.

शेवटीं या प्रयोगांतून त्याने कांही सिद्धांत काढून १७७९ सालीं अेक निबंध प्रसिद्ध केला. त्यांत अेकंदर २७ सिद्धांत मांडले होते, त्यांपैकी कांही येथे देतों. १. ग्रह, पृथ्वी आणि पृथ्वीवरचे जीव, यांचे परस्परांवर परिणाम होतात. २. हे परिणाम सर्वत्र पसरलेल्या अेका सूक्ष्म प्रवाही द्रव्यामुळें होतात. ९. मनुष्याच्या शरीरांत या पदार्थांमुळें लोहचुंबकासारखे गुण उत्पन्न होतात. ११. हे गुण जिवंत किंवा निर्जीव सृष्टींतील अितर पदार्थांना देतां येतात. १४. या चुंबक गुणाचा प्रभाव कांही अंतरावरून होऊं शकतो आणि त्याकरतां दुसऱ्या कोणत्याही पदार्थाची मध्यस्थी लागत नाही. १५. हा गुण उजेडाप्रमाणेंच आरशांच्या साह्याने वाढवतां येतो, परावर्तन पावतो. १६. आवाजाने तो अेकापासून दुसऱ्याकडे पाठवतां येतो. १८. कांही पदार्थांच्या अंगीं याच्या विरोधी गुण असतो आणि ते पदार्थ हजर असल्यास या चुंबक गुणाचा प्रभाव चालत नाही किंवा नाहीसा होतो. २०. प्रत्यक्ष लोहचुंबकावर देखील या चुंबक गुणाचा किंवा विरोधी गुणाचा परिणाम होतो आणि तरीदेखील लोहचुंबकाचा मूळचा गुण कायमच राहतो. यावरून हा गुण जरी लोहचुंब-

काच्या जातीचा आहे, तरी त्याहून अगदी वेगळा आहे असें सिद्ध होतें. २३. या गुणामुळे मज्जातंतूंचे रोग प्रत्यक्ष रीतीने आणि अितर रोग अप्रत्यक्ष रीतीने बरे करतां येतात. २७. अशा रीतीने डाक्तरांना रोगांवर अंमल चालवतां येअील आणि त्यांची कला पूर्ततेला जाईल.

या सिद्धांतांचा अर्थही करणें कठिण जाअील, पण कित्येकांवर त्यांचा फार मोठा परिणाम होऊन पॅरिस येथील वैद्यकीय संस्थांनी त्यांचें परीक्षण करण्याकरतां दोन समित्या नेमल्या; यांपैकी अेक समिति 'फॅकल्टी ऑफ मेडिसिन' आणि 'ॲकॅडेमी ऑफ सायन्सेस' या दोन संस्थांनी मिळून नेमलेली होती आणि त्यांत फ्रँक्लिन आणि लाव्ह्वाझिअे सारखे नामांकित लोक होते. या दोन्ही समित्यांनी या बाबतींत कांही प्रयोग करून या सिद्धांतांत कांही अर्थ नाही असें मत दिलें. या मताचा सारांश असा की 'जे परिणाम दिसतात ते केवळ रोग्याच्या कल्पनाशक्तीवर अवलंबून असतात, चुंबकशक्तीचें अस्तित्व मानण्याचें कारण दिसत नाहीं, कारण कोणत्याही ज्ञानेंद्रियांचें द्वारें तिचा बोध होत नाही. पण कल्पनाशक्तीवर अशा प्रयोगांनी ताण बसल्यामुळे भयंकर परिणाम होण्याचा संभव आहे, मेस्मरने कल्पिलेल्या चुंबकशक्तीला कोणतांही पुरावा नाहीं.' या समित्या अितकेंच करून थांबल्या नाहीत, त्यांनी बादशहाकडेही यासंबंधी अेक पत्र लिहून कळवलें कीं या प्रयोगांत अतिशय धोका आहे.

तथापि या समित्यांपैकी लोरां द ज्युसियु नांवाचा अेक वनस्पतिशास्त्रज्ञ वेगळा निघाला आणि त्याने असें प्रसिद्ध केलें की माझ्या प्रयोगांत झालेले सर्वच परिणाम कल्पनाशक्तीने होणें शक्य नाही, आणि त्याने जरी मेस्मरची चुंबकशक्ति मानली नाही, तरी स्पर्शाने, घर्षणाने, किंवा केवळ सांनिध्याने देखील पुष्कळ परिणाम होतो आणि तो उष्णतेमुळे होत असावा असें मत त्याने दिलें. पण अेकंदरींत मेस्मरची निराशाच झाल्यामुळें तो जर्मनींत परत गेला आणि १८१५ सालीं वारला.

मेस्मरचीं मतें जरी नंतर खोटीं ठरलीं, तरी तो प्रामाणिक होता यांत

संशय नाही. मात्र खरी शास्त्रीय पद्धति त्याला लावतां आली नाही. तथापि त्याच्यावरून अशा प्रकारच्या प्रयोगांना मेस्मेरिझम् हें नांव पडलें. गूढतेची त्याला आवड असल्यामुळेच त्याला शास्त्रीय पद्धत लावतां आली नाही आणि विरोधकांवर तो नेहमी चिडत असे. तरीपण तो गरिबांना नेहमी साह्य करीत असे आणि तो मेला तेव्हां डाक्तरांनी त्याचा सन्मान केला.

रोग्यांना जी मोहनिद्रेची स्थिति प्राप्त होते, तीसंबंधी मेस्मरने कांहीच लिहिलें नाही आणि ती त्याला माहीत होती की नाही याबद्दलही कांहींनी शंका दर्शविली आहे. ही मोहनिद्रा त्याचा अेक शिष्य ' मार्की द प्यूअिसेग्यूर ' याने निदर्शनास आणली. या अवस्थेंत रोग्यांवर सूचनेचा परिणाम अतिशय होतो हें माहीत नसल्यामुळे, आपले विचार रोग्याच्या डोक्यांत आपोआप जातात, किंवा डोळे झांकूनही त्याला दिसूं शकतें, अशा चुकीच्या कल्पनांना त्याने थारा दिला. निद्रेच्या स्थितीचा खरा उपयोग त्याने करून घेतला आणि त्याच्याकडे रोग्यांच्या झुंडीच्या झुंडी जात असत. रोग्यांची संख्या शेवटीं इतकी झाली की प्रत्येकाला वेगळे उपचार करणें अशक्य होऊन त्याला मेस्मरसारख्याच युक्त्या कराव्या लागल्या. मेस्मरच्या हौदाऐवजी त्याने अेक झाड मंतरलें, म्हणजे त्यांत माझी चुंबक शक्ति घातली आहे असें लोकांना सांगितलें, आणि या झाडाने अनेक रोगी बरे केले.

मोहनिद्रेंत अनेक चमत्कारिक परिणाम होतात, त्यांचा फायदा घेऊन लोकांची करमणूक करून पैसे मिळवण्याचा धंदा या सुमारास सुरू झाला. या विषयाचा अभ्यास करण्याकरतां अनेक संस्था निघाल्या. या विषयांत लियाँ येथील वैद्यकीय संस्थेचे अध्यक्ष पेतेतँ यांनी मेस्मरच्या सर्व मतांना विरोध करून अेक नवीन मत पुढें मांडलें की मोहनिद्रेंत ज्ञानेंद्रियाची अदलाबदल होऊं शकते. त्यांनी या संस्थेच्या सभेंत अेका बाअीला आणून ज्ञानेंद्रियांचीं कामें पोटाने किंवा बोटांनी करतां येतात असा पुरावा दिला. अर्थात् हा पुरावा फोल होता आणि हीं कामें केवळ सूचनांच्या जोरावर होत असत, परंतु यांत लुच्चेगिरी नव्हती. त्यांचा खरोखरच तसा विश्वास होता, अेरवीं त्यांनी डाक्त-

रांच्या संस्थेपुढे असा सिद्धांत मांडला नसता.

या सुमारास (१८१३) ॲबे फॅरिया नांवाचा अेक मनुष्य हिंदुस्थानांतून तिकडे गेला होता आणि त्याने असा सिद्धांत मांडला की रोग्यावर जे परिणाम होतात, ते प्रयोग करणाराच्या अंगच्या शक्तीमुळे होत नसून रोग्याच्या मेंदूतील फरकामुळें होतात, आणि हेंच मत आतां प्रस्थापित झालें आहे.

पॅरिस येथे शास्त्रज्ञांनी यांत फारसें लक्ष घातलें नाही, पण जर्मनी, डेनमार्क, रशिया येथील शास्त्रज्ञांनी मात्र याचा अभ्यास केला आणि १८१२ सालीं प्रशियन सरकारने डॉ. वोलफार्ट यांना मेस्मरला भेटून येण्यास सांगितलें आणि त्यांनी बर्लिन येथील विद्यापीठांत या विषयावर व्याख्यानें दिलीं. नंतर फ्रान्समधें या विषयाला पुन्हा अेकदां चालना मिळून १८२५ सालीं आणखी अेक समिति नेमली आणि १८३१ सालीं त्यांनी आपला अहवाल सादर केला. त्यांतही त्यांनी चुंबकशक्तीलाच महत्व दिलें आहे, पण शेवटीं रोग्यांवर जे अनेक विलक्षण परिणाम होतात त्यांचें तपशीलवार वर्णन दिलें आहे आणि तें बरोबर आहे. मोहनिद्रेंत असलेल्या मनुष्याला, भोंवतीं कितीही गडबड असली तरी, फक्त प्रयोजकाचाच आवाज अैकूं येतो आणि दुसरा अेखादा मोठा आवाज झाला तरी त्यांना तो अैकूं येत नाही. रोग्याचे डोळे मिटतात आणि ते जोराने उघडूं लागलें तर बरेच प्रयास पडतात, आणि बुबुळें वरच्या बाजूला गेलेलीं दिसतात. कधी घ्राणेंद्रियाची शक्ति नाहीशी होते, ॲमोनिआ हुंगायला दिला तरी कांही समजत नाही. अशा माणसाला गुदगुल्या केल्या, चिमटे घेतले, किंवा नखाच्या खाली टांचणी टोंचली, तरी बिलकुल समजत नाही. अेका स्त्रीवर मोहनिद्रेंत शस्त्रक्रिया केली तरी तिला समजलें नाही आणि तिच्या चेहऱ्यावर कोणताही परिणाम दिसला नाही.

तथापि सूचनेच्या परिणामांकडे या लोकांचें लक्ष गेलें नव्हतें आणि यामुळे त्यांच्या साहजिकच चुका झाल्या. १८३७ साली आणखी अेक समिति नेमली आणि त्यांच्याही लक्षांत ही गोष्ट आली नाही, आणि अनेक लोक अनेक प्रकारचीं विलक्षण विधानें करीतच होते. शेवटीं ब्युदँ नांवाच्या माणसाने अंधा-

रांत आणि डोळे बांधून कोणी वाचूं शकल्यास ३००० फ्रँकचें बक्षिस लावलें आणि हें अेका वैद्यकीय संस्थेच्या संमतीने लावलें होतें. तेव्हा डॉ. पिजेर नांवाचा मनुष्य आपल्या दहा वर्षांच्या मुलीला अशा रीतीने वाचतां येतें म्हणून पुढे आला. माँपेलिअे येथील अेका प्रोफेसरानं तिच्या या शक्तीवर विश्वास दाखवला होता आणि पॅरिसमधील कित्येक डाक्तरांपुढेही तिचे प्रयोग झाले होते. तिचा बाप काळ्या रेशमाच्या अेका पट्टीने तिचे डोळे बांधीत असे, पण डाक्तरांचें अेवढ्याने समाधान झालें नाही, आणि दुसऱ्या प्रकारची पट्टी बांधायला बाप तयार नव्हता. तेव्हा हे प्रयोग शेवटीं झालेच नाहीत.

नंतर या बक्षिसाकरतां टेस्ट नांवाच्या माणसाने अेक अिसम बरोबर आणून सांगितलें की याला मोहनिद्रेंत पेटींत बंद असलेलीं पत्रें वाचतां येतात. प्रयोगाचे वेळीं त्याला अेक शब्दही वाचतां आला नाही ! आणखीही माणसें पुढे आलीं, परंतु तें बक्षिस कोणालाही मिळालें नाही. अितके शास्त्रज्ञ याच्या मागे असतांही त्या वेळीं कोणालाही मोहनिद्रेचा उलगडा झाला नाही हें आश्चर्य आहे. ( अपूर्ण )

---

# जगांतल्या गंमती

डेन्मार्कची राजधानी कोपनहेगन येथील अेक प्रमुख अध्यापिका कुमारी ( म्हणजे अविवाहित ) अिंगर नॉर्डेनफोल्ट, हिला नुकतेंच अेक मूल झालें असून त्याच्या बापाशीं लग्न करण्याची आपली इच्छा नसल्याचें तिने जाहीर केलें आहे. अर्थातच याच्या परिणामीं तेथील मुख्य प्रधान, धर्माधिकारी, वर्तमानपत्रें (सनातनी नव्हे, तर पुढारलेलीं म्हणविणारीं देखील) आणि तिच्या हाताखालच्या २६ शिक्षकिणी यांनी तिने राजीनामा दिला पाहिजे अशी मागणी केली, पण तिने राजीनामा दिला नाही. ती म्हणाली, ‘ मी तीन महिन्यांची रजा घेतली होती, ती संपल्यावर मी जर ही गोष्ट गुप्त ठेवून कामावर रुजू झालें असतें, तर कोणी हरकत घेतली नसती, पण मग मला मूल कसें वाढवतां आलें असतें ? माझ्या प्रामाणिकपणाबद्दल मला शिक्षा कां ? मी शेवटपर्यंत लढणार. ’ तेथील

नगराध्यक्ष हेच त्या शाळेच्या व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष आहेत आणि त्यांचा तिला पाठिंबा आहे. तिच्या तर्फेनें अनेक सभा होत आहेत आणि तेथील कॉम्युनिस्टांनी तिची बाजू घेतली आहे.

---

गांधींनी सवाशें वर्षे जगण्याची अिच्छा जाहीर केली आहे, आणि मनुष्याचें आयुष्य १२० व १४० च्या दरम्यान असावें असें कांहीं तज्ञ म्हणतातच. पण डॉ. अर्नेस्ट म्हणतात की जरूर तें शास्त्रीय ज्ञान मिळाल्यास मनुष्याला ३०० वर्षे जगतां येअील. बर्नार्ड शॉ यांचें म्हणणें आहे की सध्यांची जगांतील भरमसाट लोकसंख्या आणि दळणवळणाचीं साधनें, यांमुळे उत्पन्न होणारे सामाजिक प्रश्न सोडवण्याकरतां मनुष्याने ३८६ वर्षे जगणें जरूर आहे ( पण जास्त जगण्याने लोकसंख्या जास्तच वाढेल, त्याचें काय ?) ३८६ हा आंकडा त्यांनी कोठून काढला आहे तें समजत नाही. बायबलमधला त्यांचा आवडता 'मेथ्युसेला' हा ९६९ वर्षे जगला होता असें बायबलांत लिहिलें आहे. आपल्या पुराणांतही अशा गप्पा कमी नाहीत.

---

यूरोपांत अगोदरच स्त्रियांची संख्या पुरुषांचे मानाने जास्त असे आणि आतां या युद्धांत पुष्कळच तरुणांची कत्तल झाली आहे, यामुळे हें प्रमाण अधिकच बिघडलें आहे. अमेरिकेंत स्त्रियांची संख्या जास्त नव्हती, ती आतां तेथेही जास्त झाली आहे. अिंग्लंडांत ( अर्थात् अेकपत्नीत्वाच्या कायद्यामुळे ) तीस लक्ष तरुणींना अविवाहित रहावें लागेल असें दिसतें. पण सर्वांत रशियाची स्थिति या बाबतींत वाअीट झाली आहे. या युद्धांत दोन तृतीयांश तरुण मारले गेले असें म्हणतात. शिवाय अेखादा हात, पाय, डोळा, गमावलेले, किंवा अितर प्रकारच्या असाध्य जखमा झालेले पुष्कळच आहेत. अर्थात् हल्लीच्या स्थितींत या जखमी झालेल्या लोकांनाही बायका मिळतात. कॉकेसस आणि यूक्रेन या प्रांतांत अेका पुरुषाला दहा बायका असें प्रमाण होतें, पण या प्रांतांत कांही अधिक पुरुष पाठवल्यावर आतां दहा बायकांत तीन मोडकेतोडके पुरुष वांटणीस

येतात. विवाहांना उत्तेजन देण्याकरतां सरकारने अविवाहितांवर जबरदस्त कर बसवले आहेत. अेक मूल असलेल्या विवाहित पुरुषापेक्षा अविवाहिताला सहापट कर द्यावा लागतो, आणि दोन मुलें असलेल्यापेक्षा बारापट द्यावा लागतो. रेडिओचाही विवाहांस उत्तेजन देण्याकरतां प्रचाराचें साधन म्हणून उपयोग केला जातो. मुलींना मुलांबरोबर न शिकवतां वेगळ्या शाळांतून त्यांना सुगृहिणी आणि सुमाता बनवण्याकरतां वेगळें शिक्षण दिलें जातें. रशियन तुर्कस्तानांत स्त्रियांची संख्या फारच कमी आहे, तेथे अविवाहित स्त्रियांस जाण्यास सरकारांतून उत्तेजन मिळतें. लोकसंख्या वाढवण्याकरतां वैयक्तिक आवडनिवड बाजूला ठेवावी असा सरकारी प्रचार आहे. लंगड्यालुळ्या माणसापासून देखील मुलें होऊं शकतात, या मुद्यावर जोर दिला जातो. शरीराच्या सौंदर्यापेक्षा मनाचें सौंदर्य अधिक महत्वाचें आहे, ही दृष्टि त्यांत नसते. स्त्रिया हीं मुलें उत्पन्न करण्याचीं साधनें आहेत, हा सरकारचा मुख्य मुद्दा असतो. रशियांतील क्रांति शेवटीं येथपर्यंत जाऊन पोंचली आहे !

---

अमेरिकेंतील युद्धविरोधी वृत्ति सर्वांच्या परिचयाची आहे. तिचा अेक परिणाम म्हणजे अणुशक्तीबाबत संशोधनाबद्दल नोबेल बक्षिस मिळवलेले डॉ. नील बोर, आणि दुसरे प्रख्यात शास्त्रज्ञ जॉलिओ क्यूरी, यांना अमेरिकेंत जाऊं देऊं नये असें अधिकारी म्हणत आहेत. अेकंदरींत राष्ट्रांचा अेकमेकांवर विश्वास कितपत असतो याचें हें अेक उदाहरण आहे. अमेरिकेंत सैन्याचें वर्चस्व प्रस्थापित करण्याचा जोराने प्रयत्न चालू आहे, असें मॉंट्रील येथील 'ल कॅनडा' या फ्रेंच पत्राने लिहिलें आहे. सैन्याचें वर्चस्व झाल्यास झोटिंगशाही फार लांब नाही.

---

# शास्त्रज्ञांची गळचेपी

अिंग्लंड हा देश स्वातंत्र्यप्रिय समजला जातो, निदान त्यांनी अितरांना स्वातंत्र्य दिलें नाही तरी ते स्वतःच्या स्वातंत्र्याकरतां नेहमी लढतात असा

समज आहे. या तथोक्त स्वातंत्र्यप्रिय देशांत अलीकडेच अेक झोटिंगशाही कायदा पास होऊन त्याची अंमलबजावणी झाली. नवीन कायदा असा आहे की कोणाही अनधिकृत माणसाला शास्त्रीय माहिती देणें हा गुन्हा आहे. अणुस्फोटकाची माहिती, निदान त्याच्या परिणामांची माहिती, आतां सर्वांना झाली आहे. असा स्फोटक तयार करण्यासंबंधी माहिती गुप्त रहावी, म्हणजे ज्यांना ती माहिती सध्यां आहे त्यांचेंच जगभर वर्चस्व रहावें, या हेतूने हा कायद्याचा जुलूम शास्त्रज्ञांवर होत आहे.

अिंग्लडांत डॉ. ॲलन् नन् मे या गृहस्थांनी हा कायदा मोडल्याबद्दल त्यांना दहा वर्षें सक्त मजुरीची शिक्षा नुकतीच मिळाली आहे. ज्ञान देण्याचा भयंकर गुन्हा त्यांनी कबूल केला, यामुळे कोर्टांत त्यांचा बचाव अशक्य झाला. अणुशक्तीच्या संशोधनाच्या बाबतींत त्यांनी अत्यंत मोठी कामगिरी केलेली आहे, आणि त्यांचा संशय घेण्यासारखी त्यांची वर्तणूक नाही, हें सरकारी वकिलाने कबूल केलें. आपण अणुशक्तीसंबंधी माहिती कोणाअेका माणसाला केव्हांतरी दिली, असे डॉ. मे यांनीच सरकारी गुप्त बातमीखात्याला कळवले होतें. त्यांनी स्वतः गुन्हा कबूल केला नसता, तर त्यांचे विरुद्ध कोणताही पुरावा नव्हता. परंतु ज्ञान गुप्त राखणें योग्य नव्हे, असें अनेक शास्त्रज्ञांप्रमाणें त्यांचेंही मत असल्यामुळेच त्यांनी हा गुन्हा कबूल केला आणि परिणामीं त्यांना अशी रानटी शिक्षा भोगावी लागत आहे. ही शिक्षा देणारे जस्टिस ऑलिव्हर यांनी असें मत दिलें की आपल्या देशाला हें गुपित अत्यंत महत्वाचें आहे हें माहीत असूनही त्यांनी हा ज्ञान देण्याचा गुन्हा केला, हा अक्षम्य अपराध आहे.

अशा तऱ्हेने ज्ञान लपवून ठेवण्याचा प्रयत्न म्हणजे गवतांत अग्नि लपवण्याचा प्रयत्न होय. या विजय मिळवलेल्या देशांना अशी घमेंड आहे की आपल्याशिवाय कोणालाही अणुशक्तीचा शोध स्वतंत्रपणें लागणें शक्य नाही. पण पुष्कळ वेळां शास्त्रीय शोध अनेक देशांत स्वतंत्रपणे लागत असतात. जर्मनींतही हा शोध लागला नव्हता असें नाही. मात्र प्रत्यक्ष तसा स्फोटक तयार करण्यांत अमेरिकेने आघाडी मारली. हा केवळ योगायोग आहे. जर्मनीने तो

तयार केला असता, तर आजला अिंग्लंडचा नायनाट झालेला दिसला असता. तसें झालें नाही ही आनंदाची गोष्ट आहे, परंतु ज्ञानाविरुद्ध कायदे करून हे प्रकार थांबणार नाहीत आणि कायदे करणारांचा हेतु कधीही सिद्धीस जाणें शक्य नाही. असे कायदे म्हणजे मूर्खपणाचें प्रदर्शन आहे.

---

# दारूबंदीची दुसरी बाजू

विरुद्ध बाजू विचारांतच घ्यायची नाही हा गांधींचा शिरस्ता आहे, परंतु अितरांना ती विचारांत घेतां येअील आणि ती घेतल्यास गांधींच्या अज्ञानाची आणि अविचाराची कल्पना येअील. ' टाअिम्स ऑफ अिंडिआ 'च्या ५ जूनच्या अंकांत डॉ. अेन्. आर्. करोडे यांनीं अेका पत्रांत प्रो. जे. बी. अेस्. हालडेन् या प्रख्यात शास्त्रज्ञाच्या ' अिनिक्वॉलिटी ऑफ मॅन ( मानवी असमता ) नामक पुस्तकांतील उतारा दिला आहे. राष्ट्रसंघाने ऑस्ट्रेलिआच्या ताब्यांत दिलेल्या पॅसिफिक महासागरांतील नॉरू नामक बेटांतील लोकांना ताडाच्या झाडांपासून तयार केलेली ताडी पिण्याची संवय होती. आणि यामुळे ते झिंगले म्हणजे त्यांच्या हातून खाणींत नेटाने काम होत नसे. अर्थात् दारूबंदीच्या पवित्र अिच्छेने नव्हे, तर त्यांच्याकडून शक्य तितकें जास्त काम घेण्याच्या दृष्टीने मायबाप सरकारने ताडी पिण्याविरुद्ध कायदा केला. यामुळे मजुरांनी खाणींत कदाचित् जास्त काम केलें असेल, पण याचा दुसरा परिणाम म्हणजे हा कायदा अंमलांत आल्यापासून सहा महिन्यांत लहान मुलांच्या मृत्यूंचें प्रमाण ५० टक्के-पर्यंत वाढलें. म्हणजे शेंकडा ५० मुलें पहिल्या वर्षाच्या आंतच मरूं लागलीं. तपासाअंतीं आढळलें की अंगावर पिणाऱ्या मुलांना ' बेरी-बेरी ' हा रोग होत होता. हा रोग **बी** व्हिटॅमीन न मिळाल्यास होतो. हें व्हिटॅमीन तेथील आयांच्या नेहमीच्या अन्नांत नसे, पण ताडीमधें भरपूर असे. तेथील सरकारी डाक्तराच्या डोक्यांत ही गोष्ट शेवटीं आली आणि मग ताडीविरुद्ध कायदा रद्द केला.

यानंतर शेंकडा ५० अैवजीं सातच मुलें अेका वर्षाच्या आंत मरूं लागलीं. ही हकीकत ' रॉयल सोसायटी ऑफ मेडिसिन'च्या दफ्तरांत १९३० सालीं नमूद झालेली आहे. अर्थात् सरकारने अन्नाच्या बाबतींत निष्कारण ढवळाढवळ केल्याचे परिणाम बरे होत नाहीत, असा याचा निष्कर्ष निघत असल्यामुळे या गोष्टीला बिलकुल प्रसिद्धि मिळाली नाही आणि ती गांधींच्या कानांपर्यंत पोंचली नसेल, असें प्रो. हालडेन यांनी म्हटलें आहे. पण गांधींवर अशा गोष्टींचा परिणाम बिलकुल होत नाही, ते फक्त आपलीच बाजू पाहतात, हें बहुधा त्यांना माहीत नसावें. झोपीं गेलेल्याला जागा करतां येअील, घट्ट डोळे मिटून बसलेल्याला जागा कसा करणार ?

---

# पत्रव्यवहार

## १

श्रीकृष्ण परमात्मा गीतेमधें अर्जुनाला म्हणतो, ' मेलास तर तुला स्वर्ग मिळेल, युद्ध जिंकलेंस तर पृथ्वीचा उपभोग घेशील.' पण भागवत स्कंध ११, अध्याय २१, मधें श्रीकृष्ण उद्धवाला सांगतात, ' स्वर्गादि लोकही स्वप्नांसारखे मिथ्या आहेत. अैकायला मात्र गोड ! कर्मठ पुरुष आपल्या जवळील द्रव्यादिकांचा व्यय करून त्या स्वप्नतुल्य स्वर्गादिकांच्या प्राप्तीसाठी यत्न करतात आणि समुद्र तरून परद्वीपांत जाणाऱ्या व्यापाऱ्याप्रमाणें हातचें दवडून पळत्याच्या पाठीस लागतात. ' अेकदां कृष्ण स्वर्ग मिळेल म्हणतो, व दुसऱ्यांदां स्वर्गच नाही असें म्हणतो. याची संगति शास्त्री कशी लावतात कोण जाणे ! पण श्रीकृष्ण सुद्धां स्वर्ग नाही असें म्हणतो, हें मी भागवतांत वाचलें तेव्हांपासून श्रीकृष्णाचें सुद्धां माझ्यासारखेंच मत आहे हें पाहून मला आनंद वाटतो. पुढें कृष्ण असेंही म्हणतात की श्रुतीचा अर्थ निवृत्तिपर आहे, पण वेदज्ञ तो अर्थ लोकांपासून लपवून ठेवतात. त्यांचें तसें करणें मला मान्य आहे, कारण खरा अर्थ कळला तर लोक सर्व कर्में सोडून देतील व तसें होणें अिष्ट नाही. दुसरें, मी मी म्हण-

णारा जो कोणी, तो मेल्यानंतर कोठे जातो ? तो अणुरूपी मेंदूमधें जिवंतपणीं असून सर्व शारीरिक व्यापार करतो ? नीति, अनीति, खरें, खोटें, सर्व सापेक्ष ? आपलें मत काय आहे ? **वि. स. सो.**

उ. वर आपण जी विसंगति दाखवली आहे, तिचें खरें कारण असें की भारत, भागवत आणि सर्व पुराणें हीं कृष्णद्वैपायन-व्यास नांवाच्या अेका माणसाने लिहिलीं ही कल्पना ( संशोधकांच्या मतें ) चुकीची आहे. तेव्हां त्यांत विसंगति असल्यास नवल नाही. हे वेगवेगळ्या लेखकांनी कृष्णाच्या तोंडीं घातलेले शब्द आहेत. प्रत्यक्ष श्रीकृष्ण नांवाची व्यक्ति ते म्हणाल्याचा कांहीच पुरावा नाही. अर्थात् शास्त्री हें मान्य करणार नाहींत आणि यांत संगति लावणें त्याचें काम आहे. ते ती कशी लावतात हें माहीत नाही, पण तें मोठेंसें कठिण नाही. मला कोणी संगति लावायला सांगितली तर मी अशी लावीन की श्रीकृष्णानें गीतेंत स्वतःच सांगितलें आहे की मी अेकटा मात्र सत्य आणि बाकी सर्व माया आहे. अितर सर्व देव, दैत्य, मानव, वगैरे सर्व माझींच रूपें आहेत. तीं लोकांना खरीं भासतात तीं केवळ मायेमुळें. आपण स्वप्नांत असतों तोंपर्यंत स्वप्न देखील खरेंच वाटतें की नाही ? मग स्वर्ग देखील स्वप्नवत् असला तर बिघडलें कोठे ? स्वर्गातल्या लोकांना तो खराच वाटणार ! सगळाच जेथें भास आहे, तेथें सुख आणि स्वर्ग देखील भासच असणार. श्रुतीचा निवृत्तिपर अर्थ लोकांना कळूं दिला तर सर्व लोक कर्में सोडून देतील असें वाटत नाही. कर्माच्या मुळाशीं पोटाची विवंचना किंवा अशाच कांही शारीरिक प्रेरणा असतात, त्या वेदाच्या कोणत्याही अर्थानें नाहीशा होणार नाहींत. ' मी मी म्हणणारा जो कोणी,' तोच मला मान्य नाही. म्हणजे शरीरांत आत्मा म्हणून कोणी मेंदूंत किंवा कोठेही राहणारा असतो, असें म्हणण्यास कोणताही पुरावा सांपडत नाही. तेव्हां त्याचें पुढे काय होतें, म्हणजे दिवा विझल्यावर ज्योतीचें काय होतें, असें विचारण्यासारखें आहे. कांही कारणानें शरीराची हालचाल करण्याची शक्ति नाहीशी झाली, म्हणजे त्यालाच आपण मृत्यु म्हणतों. त्या शक्तीला वेगळें अस्तित्व अर्थातच नसतें. नीति, अनीति, अर्थातच सापेक्ष

आहेत. खरें, खोटें, सापेक्ष नाहीत. त्यांना शास्त्रीय कसोटी लावतां येईल, ' परोपकारः पुण्याय, पापाय परपीडनं ' यांत पाप आणि पुण्य या धार्मिक शब्दांऐवजी नीती आणि अनीति हे शब्द घातल्यास नीतीची व्याख्या मिळते आणि ती सर्वत्र लागू पडण्यासारखी आहे. **सं**.

२.

माझें वय ३८ आहे. दहाबारा दिवस संभोगाशिवाय गेले तर लागोपाठ १-२ दिवस स्वप्नावस्था होते. कालेजांत असतांना दर आठवड्यास दोनचार वेळां होत असे. लग्न होऊन दहा वर्षे झालीं. पत्नी शिवाय अेकदोन मैत्रिणीही आहेत. अधूनमधून सर्वांशीं संभोगाचें सुख मिळते, लागोपाठ दोनतीन दिवस संभोग मिळूनही त्यानंतरच्या दिवशीं दुपारीं, अथवा त्याच रात्रीं, स्वप्नावस्था कां होते ? रात्रभर प्रवास केला, तर सकाळीं घरीं जातांच संभोगसुख घेतों, तरी दुपारीं लगेच स्वप्नावस्था कां होते ? प्रकृति बरी आहे, वैचित्र्य अनुभवितों, तरी असें कां ? यापासून कांहीं तोटा नाही ना ? अितर सर्व प्रकृति उत्तम आहे, पण सकाळीं उठतांना कंबर मात्र दुखते. ज्या दिवशीं फार दमणूक होते, किंवा स्नान चुकतें, किंवा शौचास साफ होत नाही, त्या दिवशीं बहुधा स्वप्नावस्था होते. असें होणें वाअीट असेल तर त्यावर उपाय काय ?

आपला **अेक वर्गणीदार**.

उ. स्वप्नावस्था केवळ संभोगाची संधि न मिळाल्यामुळेच होते असें नाही. थकवा किंवा शौचास साफ न होणें हीं स्वप्नावस्थेचीं नेहमीचीं कारणें आहेत. शेवटीं आपली कंबर दुखते असें आपण म्हणतां, तेव्हां आपणास विश्रांतीची जरूर आहे असें दिसतें. अेकंदरींत आपली मज्जासंस्था सुस्थितींत नाहीं, फाजील संवेदनाशील आहे, हें उघड आहे. तेव्हां विश्रांति घेवून, कांही दिवस संभोग वर्ज्य करून, पोट साफ ठेवण्याची व्यवस्था करावी. कच्च्या आहारानें पोट आपोआप साफ राहतें. तें शक्य नसल्यास मधून मधून अेखादे सौम्य सारक औषध घ्यावें, रेचक घेऊं नये. योगासनांचा अभ्यास करून संवय ठेवल्यास त्यांनी पोटाच्या स्नायूंना व्यायाम मिळतो. या आसनां-

संबंधी धार्मिक गप्पांवर विश्वास ठेवण्याचें कारण नाही, पण व्यायाम या दृष्टीनें तीं उत्तम आहेत. आपल्याला झेपतील तितकीं करावीं. त्यांचा मज्जा-तंतूसही फायदा होण्याचा संभव आहे. **सं.**

३.

रजिस्टर लग्नांत स्त्रीपुरुषांची वयें काय असलीं पाहिजेत ? तसेंच पूर्वी कोणत्याही धर्माचा नाही अशी शपथ घ्यावी लागत असे, तशी हल्ली लागते किंवा काय ? रजिस्टरला कायदेशीर नोटिस किती दिवसांची दिली पाहिजे ? फी काय पडते ? सर्व रजिस्टर कचेरींत लग्नें नोंदतां येतात काय ? तसेंच पहिली बायको हयात असतांना हिंदू धर्माप्रमाणें दुसरें लग्न रजिस्टर पद्धतीनें करतां येतें काय, वगैरे सर्व माहिती द्याल अशी आशा आहे.

आपला **दत्तात्रय शिवराम चिखले.**

उ. हल्ली कोणतेंहि लग्न कायदेशीर होण्यास वधूचें वय १४ व वराचें वय १८ चे वर असावें लागतें. तितकें वय असेल आणि पालकांची संमति असेल, तर ( बाप जिवंत असेल तर बापच पालक समजतात, तो नसेल तर जो कोणी कायदेशीर पालक असेल तो ) लग्न नोंदतां येतें, परंतु पालकांची संमति नसेल तर दोघांचेंहि वय २१ चे वर असावें लागतें. प्रत्यक्ष लग्नाची नोंद होण्यापूर्वी नोंदणीकचेरींत १५ दिवसांची सूचना द्यावी लागते व ती देण्यापूर्वी दोघांपैकी अेकाला तरी त्या गांवांत निदान १५ दिवस तरी वस्ती करावी लागते. सूचना दोघांच्या सह्यांनिशींच दिली पाहिजे असें नाही, अेकाने दिली तरी चालते, व ती स्वतःच दिली पाहिजे असेंही नाही, कोणाबरोबर पाठवली तरी चालते. प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणीं ' रजिस्ट्रार ' ( किंवा 'सबरजिस्ट्रार' ) असतो, आणि त्याला लग्नाची नोंद करण्याचा अधिकार असतो. नोंदण्याची फी पांच रुपये असते, परंतु दोघांनी कचेरींत जाण्याअैवजी ' रजिस्ट्रार 'ला घरीं बोलावूनही नोंद करतां येते, त्याकरतां पांचांअैवजी रु. १५ ते ३० फी पडते. पहिली बायको हयात असतांना या पद्धतीने लग्न करतां येत नाही, परंतु हल्ली हिंदूंना धर्मासंबंधी शपथ घ्यावी लागत नाही. **सं.**

---

# शारदेचें पत्र

अत्र्यांच्या ‘ नवयुग ’ च्या २६ मेच्या अंकांत ‘ आचार्य अत्र्यांची असीम प्रतिभाच रंगभूमीचें वैभव वाढवील, ’ असा मथळा पाहून मला विशेष आश्चर्य वाटलें नाही, कारण अत्र्यांची स्तुति त्यांच्या स्वतःच्या पत्रांत यायचो नाही तर कोठे यायची ? त्याचबरोबर “ जग काय म्हणेल ? या आचार्य अत्रे यांच्या नाटकाचें मार्मिक परीक्षण,” असाही अेक पोटमथळा होता. पण स्तुति करणारें परीक्षण, लेखकाच्या मताने नेहमीच मार्मिक असतें, तेव्हां त्यांतही कांही विशेष नाही म्हणून मी तें अजीबात वाचणार नव्हतें, पण ‘ परीक्षक पां. वा. गाडगीळ, ’ आणि त्यांचा फोटो दिला होता, तेव्हां तें वाचून काढलें. अर्थात् गाडगिळांच्या चिकित्सक बुद्धीबद्दल माझें फारसें चांगलें मत कधीच नव्हतें, कारण मार्क्सच्या तथाकथित तत्वज्ञानाला बळी पडून त्यांनी त्याच्या प्रचंड ग्रथांचें मराठी भाषांतर करण्याचा उपद्व्याप केला आहे हें मला माहीत होतें, आणि त्यांच्या डोळ्यांत धूळ टाकणें फारसें कठीण नाही हें यावरून सिद्धच होतें. पण त्यांचें म्हणणें तरी काय आहे हें पाहण्याची अिच्छा झाली, कारण माझें मत त्या नाटकाबद्दल चांगलें नाही हें मी पूर्वीच लिहिलें आहे. तरीपण गाडगिळांना कशाने भुरळ पडली हें पाहावेंसें वाटलें.

त्यांचा मुख्य मुद्दा असा दिसतो की या नाटकांतले संवाद चांगले आहेत, आणि ते चांगले आहेत हें मलाही मान्य आहे. अत्र्यांचे संवाद अेकंदरींत चांगलेच असतात, पण केवळ तेवढ्याने नाटक चांगलें ठरत नाही, त्याला अितर अनेक गोष्टींची जोड लागते, ती या नाटकांत नाही. अत्रे जरी कथानकाला मुळीच महत्व न देतां केवळ संवादांवर नाटक मारून नेऊं शकतात, तरी रसिक प्रेक्षकाचें नुसत्या संवादांनीं कधीही समाधान होणार नाही. या नाटकांतलें कथानक समाधानकारक नाही. अत्र्यांच्या दृष्टीनें जी आदर्श स्त्री त्यांनी निर्माण केली आहे, ती प्रथम सात वर्षे पशुतुल्य नवऱ्याच्या सहवासांत

काढते, हें अेक सोडून देऊं. पण जागृत झाल्यावर ती काय करते ? तर नवऱ्याचें न अैकतां नाटकांत काम करायला सिद्ध होते. दुर्दैवानें या आदर्श स्त्रीची भूमिका अेका पुरुषाने अत्यंत गचाळ रीतीने केली आहे, पण गाडगिळांना तेंच काम पसंत आहे. कारण काय, तर त्यांना बालगंधर्वांची आठवण होते ! ज्यांचे आदर्शच असे आहेत त्यांची रसिकता काय वर्णावी ? बरें ही आदर्श स्त्री नाटकाच्या अितकी नादीं लागते कीं स्वतःच्या लहान मुलीला झटके येत असतांही ती नाटकाला निघून जाते ! अशा स्त्रियांना झोडपून काढल्या पाहिजेत, आणि गाडगिळांना देखील ती मोठीशी पसंत आहे असें नाही. गाडगिळाना कथानक देखील पसंत नाहीच, कारण तें कसें बदलतां आलें असतें याविषयी ते सूचना करतात. पण बापूराव मान्यांच्या कामावर ते खुष आहेत ! ही मनाची विकृति आहे असें म्हणणें भाग आहे.

भाषेच्या अवडंबराने गाडगिळांची नेहमीच फसवणूक होते हें मार्क्सच्या भाषांतरावरून दिसतेंच, पण या नाटकांतही अत्र्यांच्या भाषेवर ते भुलले आहेत. कांहीं ठराविक शब्दांनीं आणि वाक्यांनी टाळ्या मिळवतां येतात हें अत्र्यांना माहीत आहे. ' स्त्री ही अनंत कालची माता आहे ' असें लिहिलें, की त्याचा कांही अर्थ होत नसला तरी टाळ्यांचा कडकडाट होतोच, आणि नाटककाराला दुसरें काय पाहिजे ? या नाटकांत उल्का म्हणते ' पुरुषांत आणि बायकांत हा फरक असतो, स्वतःच्या बायकांची अब्रू वेशीवर टांगायला पुरुष मागेपुढे पहात नाहींत, तर आपल्या नवऱ्याच्या बेअब्रूवर पांघरूण घालून ती झांकतांना आपल्या देहाचीं लक्तरें झालीं तरी स्त्रिया त्याची पर्वा करीत नाहीत.' झालें, गाडगिळांनी टाळ्या वाजवल्या. ते म्हणतात, ' तें वाक्य जसें सत्य आहे, तसेंच तें क्रूरही आहे. ' तरीपण अत्र्यांनी पुरुषांना अन्याय केला आहे असें गाडगीळ म्हणतातच. अगोदर हें वाक्य खरें आहे असें मला वाटत नाही. पुरुषांच्या अब्रूची बिलकुल पर्वा न करणाऱ्या बायकाही मी पाहिल्या आहेत, आणि बायकोची अब्रू चवाठ्यावर येऊं न देणारे पुरुषही मी पाहिले आहेत. हीं असलीं व्यापक विधानें टाळ्या घ्यायला उपयोगी पडलीं

तरी बहुधा खरीं नसतात.

अत्र्यांच्या मताने जी स्त्री आदर्श आहे, ती गाडगिळांच्या मतें आदर्श नाही. ते म्हणतात की अशा स्त्रीचा नवरा पूर्वी बदफैली नसला तर तो तिच्या वागणुकीने तसा होईल. हा सगळा गोंधळ कां झाला आहे, याचें कारण मला मागाहून असें कळलें की अत्र्यांची ही आदर्श स्त्री म्हणजे हिंदुस्थान, आणि तिचा नवरा म्हणजे ब्रिटिश सरकार, अशा कल्पनेने हें नाटक म्हणजे अेक रूपक केलेलें आहे. म्हणजे पृथ्वीराजने जो आचरटपणा ‘ दीवार ’ नाटकाच्या रूपाने हिंदी रंगभूमीवर आणला आहे, तसलाच हाही अचरटपणा आहे. ही अत्र्यांची आदर्श स्त्री अत्र्यांच्या नेहमीच्या सनातनी मतांप्रमाणे पश्चात्ताप होऊन परत नवऱ्याकडे कां आली नाही, याचा उलगडा हें अैकल्यावर झाला. कारण हिंदुस्थानला पुनः ब्रिटिशांच्या ताब्यांत देऊन कसें चालेल ? अेकंदरींत रूपकात्मक नाटक लिहायचा प्रयत्न केला म्हणजे असा कांहीतरी आचरटपणा व्हायचाच, त्याला अत्रे तरी काय करणार ?

अत्र्यांच्या आदर्श स्त्रीला गाडगिळांनी शिव्याच दिल्या आहेत, तरीपण ते शेवटीं म्हणतात, ‘नाटक अतिशय चांगलें झालें आहे.’ ते बापूराव मान्यांवर भुलले तर त्याला कोण काय करणार ? पण ही मार्मिकता आहे असें मला वाटत नाही.

झोटिंगशाहीचें जें मुख्य तत्व म्हणजे अधिकाऱ्यांनीं स्वतःची मतें जबरदस्तीनें दुसऱ्यावर लादून त्यांप्रमाणें त्यांना वागायला लावायचें, तें स्वातंत्र्य-प्रेमी म्हणवणाऱ्या अिंग्लंडसारख्या देशांत देखील अजून अंमलांत असलेलें आढळतें. अर्थात् तेथे जुल्म करणारा हिटलरसारखा अेकटा मनुष्य नाही, पण तेथे धार्मिक लोकांचें अितकें प्राबल्य आहे, की नास्तिकांना देखील ते आपल्या-सारखे वागायला लावतात. अिंग्रज सैन्यांत दर रविवारीं सर्वांना चर्चमध्यें जाऊन पाद्र्याची बडबड अैकण्याची सक्ती असते. यासंबंधी पार्लमेंटमध्यें अनेक वेळां वाद झालेले आहेत, तरींपण सर्व कारभार बहुमतानें चालत असल्यामुळें बहुमतवाले लोक दुसऱ्यावर जुल्म करूं शकतात. तरीपण सक्ती असूं नये हें

अमान्य करतां न आल्यामुळें अेकदां अशी सवलत देण्यांत आली कीं ज्यांची विशेष हरकत असेल त्यांनी गैरहजर राहण्याची परवानगी मागून गैरहजर रहावें. ही परवानगी मिळे देखील, पण अशा मनुष्याची खोड मोडण्याकरतां संडास धुणें किंवा अशाच प्रकारचीं घाणेरडीं किंवा कंटाळवाणीं कामें त्याला सांगण्यांत येत असत, कारण वरचा अधिकारी धार्मिक असायचा हें ठरलेलेंच. तेव्हां अशी कामें करावीं लागण्यापेक्षां पाद्र्याची बडबड ऐकणें हीच कमी शिक्षा मानून कोणी परवानगी मागेना. अर्थात् कायदेमंडळांत सांगायला ही गोष्ट महत्वाची होती, की आम्ही गैरहजर राहण्याची परवानगी देत असतांना देखील कोणीच मागत नाही, तेव्हां या सक्तीला कोणाची हरकत नाही, पण सक्तीचें तत्वच मूलतः चुकीचें आहे हें धार्मिक लोक कबूल करीनात. अर्थात् सैन्यांत युद्धाकरतां म्हणून शिस्तीच्या दृष्टीनें अनेक प्रकारची सक्ती असते, पण ती युद्धाला उपयुक्त बाबींपुरतीच असावी, प्रार्थनेसारख्या फालतू बाबतींत असूं नये, ही गोष्ट देखील अजून अिंग्लंडांत मान्य होत नाही.

'किर्लोस्कर' च्या जूनच्या अंकांत प्रिं. सतीश कालेलकर यांचा डॉ. सर सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्यावर अेक स्तुतिपर लेख आहे. हें ठीकच आहे, कारण ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीने प्रोफेसर नेमून ज्या हिंदी विद्वानाचा गौरव केला, त्याची स्तुति हिंदी लेखकांनी करायची नाही तर कोणी करायची ? पण ही स्तुति माझ्या मतें फाजील झाली आहे. राधाकृष्णन् विद्वान आहेत, ते अिंग्लिश सुंदर बोलतात, हिंदी आणि यूरोपीय तत्वज्ञानाची त्यांना उत्तम माहिती आहे, हें सर्व मला माहीत आहे आणि त्याबद्दल मला शंका नाही. पण धार्मिक, आध्यात्मिक लिखाणांत नेहमीच जो गोंधळ दिसतो, तो त्यांच्याही लिखाणांत आणि बोलण्यांत दिसतो. याचा अर्थच असा की हा गोंधळ नाहीसा होण्याकरतां जी मूलगामी बुद्धि लागते, तिचा त्यांच्यांत अभाव आहे. यामुळे नास्तिकांना त्यांचीं मतें कधीच पटणें शक्य नाही. कालेलकर लिहितात, "आम्ही धर्माला मानीत नाही, असें म्हणणाऱ्या हजारों विद्यार्थ्यांना अेका अत्यंत धर्मनिष्ठ तत्वज्ञान्याने स्वतःच्या ज्ञानाने, वक्तव्याने, मुग्ध करून सोडलें होतें."

हे नास्तिक विद्यार्थी अर्धवटच असले पाहिजेत, कारण ज्याचे विचार पटत नाहीत, त्याच्या वक्तृत्वाबद्दल जरी कौतुक वाटलें, तरी त्याने मुग्ध होण्याचें कारण नाही. लेखाच्या शेवटीं लेखक म्हणतो, 'अेकंदर सर्व कूट प्रश्नांची छाननी केली असतां धर्मच सर्व राष्ट्रांना शेवटीं अेकत्र आणील अशी त्यांची ठाम समजूत आहे.' अर्थात् अशी समजूत असणारा मनुष्य विद्वान असूं शकेल, पण त्याला फारसें तारतम्य नाही असेंच म्हणावें लागतें. अिंग्लंडांत क्रिस्ती धर्माच्या ज्या अनेक शाखा आहेत, त्यांचें अजूनपर्यंत धार्मिक शिक्षणाबद्दल अेकमत होत नाही, आणि धर्माने सर्व राष्ट्रें अेक होतील असें हे विद्वान म्हणतात !

प्रो. क्षीरसागर यांच्या 'सुवर्णतुला' या पुस्तकांत देखील राधाकृष्णन्-वर अेक निबंध आहे. तो मी वाचला नाहीं, पण डॉ. चिटणिसांनी या पुस्तकाचें परीक्षण 'धनुर्धारी'च्या १ जूनच्या अंकांत केलें आहे. अर्थात् प्रो. क्षीरसागर हे स्वतः धार्मिक असल्यामुळें आणि विभूतिपूजक, किंबहुना ज्यांना कोणीच विभूति म्हणत नाही अशांचीही पूजा करणारे असल्यामुळे, त्यांनी राधाकृष्णन्‌ची अफाट स्तुति केली आहे आणि त्यांच्या मतांना अेडिंग्टन्‌चा पाठिंबा असल्याचें सांगितलें आहे. ऑलिव्हर लॉजच्या आधाराने मृतात्मे खरे ठरवण्यापैकीच हा प्रकार आहे. मला अेकंदरींत असें दिसतें की राधाकृष्णन्‌च कर्तृत्व बुद्धीपेक्षा स्मरणशक्तीवरच आधारलेलें आहे, कारण स्मरणशक्ति उत्तम असलेल्या मनुष्याला भाषेवर प्रभुत्व मिळवणें सोपें असतें आणि ज्ञानही मिळवतां येतें, म्हणजे आजपर्यंत कोणी काय लिहिलें आहे हें पाहून तें सांठवतां येतें. यापलीकडे त्यांची मजल जात नाहीं. अशा माणसाला तत्ववेत्ता असें प्रचलित अर्थाने म्हणतां येअील, कारण त्याचा अर्थ 'तत्वज्ञान या विषयाचा अभ्यास केलेला मनुष्य' अितकाच असतो. पण ज्याला तत्त्व, म्हणजे सत्य कळतें, असा त्याचा अर्थ करणें असल्यास हा शब्द अशा माणसांना लावतां येणार नाही हें उघड आहे.

तुझी शारदा

प्री ति नि त्या ग

या दीन दैवी
भावनांची कलात्मक
गुंफण करणारा—

मिनर्वाचा नवा
सामाजिक बोलपट

# श मा

- भूमिका -

अभिनयसम्राज्ञी

**मे ह ता ब**

वास्ती, अबूबकर,
प्रकाश, मा. रतन.

- संगीत -

गुलाम हैदर

निर्माते—सोराब मोदी

## मि न र्व्हा

पटगृहांत धडाक्यानें चालू आहे.

---

गीता निजामीसाठीं

## तीन खून—

'नवयुग'चा नवा चमत्कारपट—

# क म रा नं. ९

- भूमिका -

पन्नापावन गीता निजामी
शाम, के. एन्. सिंग, सरोज बोरकर
राजविश्वास, रणधीर, केसरी

- दिग्दर्शक -

वेदी

**कृष्ण**— दुभाष थिएटर

—पिअरलेस प्रकाशन—

Registered No. B. 2289.


राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई, नं. ४.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु., ट. ख, ५आणे.

२. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], चौथी आवृत्ति
किंमत रु. ४, ट. ख. ६ आणे.

३. संततिनियमन [ सचित्र ], ८ वी आवृत्ति,
किंमत १ रुपया, ट. ख. ५ आणे.

४. गुप्तरोगांपासून बचाव, ४ थी आ. रु. १
ट. ख. ४ आणे.

५. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [ पहिलीं तीन वर्षें ], खलास आहे.
भाग २ रा [वर्षें ४-५-६], किं. २-०-०, ट.ख.५आ.

६. त्वचेची निगा. किं. ८ आ. ट. ख. ४ आ.

७. गुरुबाजी (नाटक) किं. ८ आ. ट. ख. ५ आणे

८. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ५ आ.

९. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ४ आ.

## डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहेरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ५आं.

२. मूळव्याध. किं. ४ आ.

## श्री. भास्कर धोंडो कर्वे, एम्. एड्. कृत,

१. मी कसा झालों ? किं. ८ आ., ट. ख. ४ आ.

२. बालमनाचें रहस्य, नवी आवृत्ति छापत आहे.

## प्रो. धों. के. कर्वे कृत

संक्षिप्त आत्मवृत्त, किं. १२ आणे ट. ख. ५ आ.



मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस, १०३, ताडदेव रोड, मुंबई नं. ७

मुद्रक व प्रकाशकः—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट् एजन्सी,
नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई.